**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक १६.०५.२०२६ शनिवार**

**१) ''डिजीटल अरेस्ट व सायबर सुरक्षा'' विषयावरील जनजागृती कार्यक्रम संपन्न :—**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे अध्यक्षतेत **''सायबर सुरक्षा व जनजागृती''** कार्यक्रम आज दिनांक १६.०५.२०२६ रोजी १२.०० वा. ते ०१.३० वा. दरम्यान, सायबर पोलीस ठाणे यांचे मार्फतीने पोलीस भवन, ऑडीटोरीयम हॉल, सिव्हील लाईन, नागपुर येथे आयोजीत करण्यात आला होता. डिजीटल अरेस्ट, सायबर सुरक्षा व जनजागृती कार्यक्रमाकरीता प्रमुख पाहुणे म्हणुन मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त, नागपुर शहर, प्राध्यापिका डॉ. श्रीमती दिशा खैरे, भारतीय रिझर्व्ह बॅकेचे अधिकारी श्री. पियुष तेलरांधे तथा श्री. हिमांशु जोशी हे उपस्थित होते.

मा. सह पोलीस आयुक्त नागपुर शहर यांनी सायबर सुरक्षा व जनजागृती कार्यक्रमाची प्रस्तावना सादर करताना, सायबर गुन्ह्यामध्ये डिजीटल अरेस्ट करून, मोठ्या प्रमाणात फसवणुक केल्या जात आहेत. अशा गुन्ह्यांना आळा घालायचा असेल तर, जनतेमध्ये सायबर जागृती असणे गरजेचे आहे असे सांगीतले.

प्रमुख पाहुणे प्रवक्ते श्री. पियुष तेलरांधे यांनी उपस्थित सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करतांना, सायबर गुन्हेगारीबाबत सर्व उपस्थितांना मार्गदर्शक माहीती देवुन, सायबर गुन्हेगारीचे प्रकार, बचावात्मक मार्ग तसेच, कुठल्याही प्रलोभनाला बळी न जाणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना संबोधीत करतांना, सायबर गुन्हेगारीचे वेगवेगळे प्रकारांविषयी माहीती देवुन, त्यांपासुन बचाव करायचा असल्यास सायबर जनजागृती गरजेची असुन, प्रत्येकाने सायबर साक्षर असले पाहीजे असे सांगीतले. तसेच, यासंबधाने न्यायालयीन प्रक्रीया, पोलीस तपास यावर जास्तीत जास्त प्रशिक्षण शिबीरे घेवुन, सायबर गुन्हे यावर अंकुश लावण्याचे सर्वोतोपरी प्रयत्न सुरू असल्याचेही सांगीतले. याप्रसंगी सायबर पोलीसांनी फसवणुक झालेल्या नागरीकांना त्यांची फसवणुक झालेली रक्कम ही आरोपींचे खात्याला फ्रिज करून, मोठ्या प्रमाणात रक्कम प्राप्त करून, फिर्यादी यांना परत केल्या. तसेच, मिसींग मोबाईल हस्तगत करून, त्यांचे मुळ मालकांना सुपुर्द करण्यात आले. ज्यांना रक्कम व मोबाईल परत मिळाले, त्यांनी नागपुर पोलीसांप्रती आदरभाव व आनंद व्यक्त करून, नागपुर पोलीसांना धन्यवाद दिले.

कार्यक्रमात मा. पोलीस उप आयुक्त, श्री. लोहीत मतानी, श्री. दिपक अग्रवाल, सर्व सहा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर, सर्व मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नागपुर शहर, तसेच, पोलीस अधिकारी व अंमलदार, त्याचप्रमाणे स्वयंसेवी संघटना, प्रतीष्ठीत नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. खुशी कडु (विद्यार्थीनी) व आभार प्रदर्शन मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) नागपुर शहर यांनी केले.





**२) पोलीस भवन, नागपूर शहर येथे 'योगा ॲन्ड माईन्ड मॅनेजमेंट' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न :–**

दिनांक १६.०५.२०२६ रोजी १५.०० वा. पोलीस भवन येथील सभागृहात मा. भुषणकुमार उपाध्याय, माजी पोलीस आयुक्त, नागपूर शहर लिखित "Yoga and Mind Management" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. प्रकाशन सोहळ्यास अध्यक्ष म्हणून कवि कालिदास संस्कृत विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु श्री. अतुल नारायण वैद्य लाभले होते. कार्यक्रमास श्री. डॉ. रविंद्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परिक्षेत्र, श्री. विजय फणशीकर, मुख्य संपादक, हितवाद वृत्तपत्र, श्री. प्रविण जोशी, संचालक—प्रेरणा महाविद्यालय, नागपूर, श्री. दिलीपकुमार सिंग, समादेशक सीआयएसएफ, नागपूर तसेच, नागपुर शहर चे सर्व पोलीस उपायुक्त आणि आमंत्रीत मान्यवर आपले परीवारासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. अतुल वैद्य यांनी पुस्तकाचे विमोचन करतांना, योग हा फक्त व्यायाम प्रकार नसुन, तो जिवन जगण्याची एक चौकट आहे. त्यात व्यक्तीने स्वत:ला समाविष्ट केल्यास तो शारीरिकरित्या सुदृढ होवुन, त्याचे मानसिक संतुलन राखण्यासही मदत होते असे सांगीतले.

"Yoga and Mind Management" या पुस्तकाचे लेखक मा. श्री. भुषणकुमार उपाध्याय, माजी पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी उपस्थितांना संबोधित करताना, योगा प्रकार प्रत्येकाने आपल्या जिवनात उतरविला पाहीजे. त्यामुळे सुदृढ चेतनेसह निरोगी आयुष्य जगण्यास मदत होते असे सांगुन, नमुद पुस्तकामध्ये योगसाधनेचे अनेक प्रकार समाविष्ठ केल्याने, योग साधना करण्यास मदत होणार याबाबात सांगीतले.

मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर श्री. डॉ. रविन्द्रकुमार सिंघल यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना, प्रत्येकाला अंमली पदार्थापासुन लांब राहुन, शारिरीक स्वास्थ्य प्राप्त करणे महत्वाचे असुन, त्याबद्दल योगाअभ्यास खुप मोलाचा मार्गदर्शक ठरतो असे सांगीतले. योगा अभ्यासाने शारीरिक तसेच, मानसिक संतुलन साधले जाते. करीता, सर्व उपस्थितांनी व त्यांचे परिवारातील सदस्यांनी, परीचितांनी योगाअभ्यास आपल्या जिवनात उतरविला पाहीजे असे आवाहन केले. मा. पोलीस आयुक्त यांनी "Yoga and Mind Management" या पुस्तक प्रकाशन सोहळ्याप्रसंगी सर्व उपस्थितांचे स्वागत करून, आभार व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान, मा. प्रविण जोशी, संचालक प्रेरणा कॉलेज, नागपुर यांनी पुस्तकाची समीक्षा सादर केली. कार्यक्रमाचे सुत्र संचालन तथा आभार प्रदर्शन सहायक पोलीस आयुक्त, श्री. नरेंद्र हिवरे यांनी केले.



(कामगिरी)

<u>**जरीपटका पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक, एकुण ०५ गुन्हे उघडकीस.**</u>

दिनांक ३०.०४.२०२६ चे १२.०० वा. ते १५.४० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट क्र. ३४६, नागार्जुन कॉलनी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी दिनेश देवराव राऊत, वय ४२ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह लग्न समारंभाकरीता कळमेश्वर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे गेट व मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, हॉलमधील लोखंडी आलमारीचे लॉकर तोडून त्यातील रोख ६०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने, रोलेक्स कंपनीचे हातघडयाळ, लॅपटॉप असा एकुण किंमती २,३१,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. तसेच फिर्यादीचे घराशेजारी राहणाऱ्या श्रीमती महिला धमेंद्र बन्सोड, वय २६ वर्षे, रा. प्लॉट क्र. ६२९, नागार्जुन कॉलनी, जरीपटका ह्या घरी नसतांना, कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, बेडरुमधील लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती १,२३,६००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अज्ञात चोरटयांनी फिर्यादी तथा त्यांचे शेजारी हे घरी नसतांना त्यांचे दोन्ही घरातील एकूण ३,५५,१००/— रु. चा मुद्येमाल चोरुन नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, जरीपटका पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी क्र. १) अभिषेक उर्फ दद्या राजेंद्र सिंग, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. ५५, रमाई नगर, नारी रोड, उप्पलवाडी, नागपुर २) विशाल उर्फ चिमंडी राजु सिंग, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. १०६, पार्वती नगर, कळमना, नागपुर यांना समता नगर भागात पल्सर मोटारसायकल क्र. एम.एच. ४० सि.झेड. ५६१८ सह ताब्यात घेतले. आरोपींची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्यांचे खिशात सोने—चांदीचे दागिने मिळुन आल्याने, त्यांची सखोल विचारपुस केली असता, आरोपींनी वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांचे ताब्यातुन सोन्याचे दागिने वजनी ३० ग्रॅम व चांदीचे दागिने वजनी १०९ ग्रॅम व गुन्हा करतांना वापरलेली मोटारसायकल असा एकुण ५,३८,५९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, सपोनि. आशिष मोरखडे, जितेंद्र

ठाकुर, पोहवा. रमेश यादव, पोअं. मंगेश दोनाडकर, पंकज वरकड, राकेश सिंग, नितेश नागपुर, अमोल हरणे, सुनिल विश्वकर्मा, सचिन टंगले व मपोहवा. मिना मस्के यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १६.०५.२०२६ चे ०६.१५ वा. सुमारास, फिर्यादी रोशन मोरबा बारापात्रे, वय ४६ वर्षे, रा. प्लॉट नं. ४१, माता कचेरी ले—आऊट, अंबीका नगर, हुडकेश्वर, नागपुर हे त्यांचे मित्र नामे सुरेश नामदेवराव वाढई, वय ४९ वर्षे, रा. प्लॉट नं. ५५, उदय नगर, रिंग रोड, तपस्या विद्यामंदीर जवळ, नागपुर यांना सोबत घेवुन त्यांचे ॲक्टीवा गाडी क्र. एम.ए. ३१ ई.डी. ४१४५ ने डबलसिट दुंडा मारोती येथे दर्शनाकरीता जात असता, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, सपस्या चौक ते मानेवाडा चौकाकडे जाणारे सिमेंट रोडवर साईकृपा सिमेंट व हार्डवेअर दुकानासमोर एका हिरव्या रंगाचे आपली बस चे चालकाने त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे ॲक्टीवाला धडक देवुन, मदत न करता पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादी यांना किरकोळ मार लागला व त्यांचे मित्र सुरेश वाढई हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. योगेश कोरडे ८८८८१८१९७७ यांनी अज्ञात आपली बस चालकाविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १८४, १३४, १७७, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :—** तनुश्री पुरूषोत्तम चेन्ने, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ६८, विजयालक्ष्मी पंडीत नगर, नंदनवन, नागपूर ही दिनांक १२.०५.२०२६ रोजी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, डोळे—काळे, केस— काळे लांब, अंगात— ब्राऊन रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.

**२) पोलीस ठाणे कपीलनगर :—** कु. राशी विनोद सेंदुरकर, वय १७ वर्षे, रा. कपीलनगर, नागपूर ही दिनांक २७.०४.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीतील बापुकुटी लॉन, कवठा रोड, नागपुर येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, डोळे— काळे,

केस– काळे लांब, अंगात– जांभळ्या रंगाचा थ्रि पिस सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते. ओळख– डावा डोळा उजव्या डोळ्यापेक्षा बारीक आहे.



तनुश्री



राशी

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**